# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** धरमपेठ झोन क्र. २ अंतर्गत मौजा तेलंगखेडी येथे
{**सा.बां.वि. झोन क्र. ०२**} व्हेटरनरी कॉलेज ते मोठा हनुमानमंदीर पर्यंत २४.० मी. रुंद डी.पी. रस्त्याचे बांधकाम करणे या कामाची प्राकलनीय राशी रु. १९,०२,६३,५२४/— असून कामाची एकून प्रशासकीय मान्यता राशी रु. २४,५३,१६,९२०/— आहे. सदर्हू कामात रस्त्याचे बांधकामासह, उच्च दाब विद्यूत लाईन शिफ्ट करणे व रस्त्याचे विद्यूतीकरणाचे खर्चाचा समावेश आहे. सबंधीत रस्त्याचे स्थापत्य कामाचे कार्यादेश निर्गमीत करण्यात आले असून या कामाकरीता मे. डी.सी. गुरुबक्षाणी या कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली आहे. हा रस्ता महाराष्ट्र पशु व मत्स्यविद्यान विद्यापीठ यांचे जागेमधून जात असून रस्त्याचे कामामूळे येथील जागेचे दोन भागात विभाजन होते असल्याने संबधीत विद्याापीठामार्फत रस्त्यामूळे बाधीत जागेचे क्षेत्रफळाइतके चटईक्षेत्र देण्याची व रस्त्याचे दोन्ही बाजूस पक्की सुरक्षा भिंत बांधून देण्याबाबत विभागास पत्र दिलेले होते. त्यानुसार विभागामार्फत नगर रचना विभागाचे सल्ल्यानुसार मा. आयुक्त यांचे मान्यतेने बाधीत जागेच्या क्षेत्रफळाइतके चटईक्षेत्र देण्यास मान्यता प्रदान केली होती परंतू सुरक्षाभिंत बांधण्यास मान्यता प्रदान केलेली न्व्हती. या कारणास्तव महाराष्ट्र पशु व मत्स्यविद्यान विद्यापीठ यांचे मार्फत रस्ता बांधकामामूळे रस्त्याचे दोन्ही बाजूस अतिक्रमण होण्याची शक्यता असल्याने सुरक्षाभिंत बांधून देण्याचे हमी दिल्यानंतरच जागा हस्तांतरण करण्याबाबत नाहरकत देण्यात येईल असे कळविले होते. करीता पुन्हा याबाबत मा. मुख्य अभिंयता यांनी विद्यापीठाचे कार्यकारी अभिंयता व रजिस्ट्रार यांचेशी चर्चा करुन मा. आयुक्त तथा प्रशासक यांना या बाबत अवगत केले होते. त्यानसार सुरक्षाभिंत बांधकामाकरीता लागणा—या खर्चाचे प्राकलन तयार करण्यास्तव कळविले होते. विभागामार्फत देण्यात आलेल्या प्रस्तावानुसार रस्त्याचे दोन्ही बाजूस २.६० मी. उंच सुरक्षा भिंत बांधकामाकरीता एकूण ४४,०२,६३२/— रु. खर्च अपेक्षीत असून हा खर्च कमी दराने प्राप्त निविदे मूळे आलेल्या बचतीच्या राशीतून प्रस्तावीत आहे. तसेच सदर्हू काम यापूर्वीचे मंजूर दरावर करण्यास या कामाचे कंत्राटदार मे. डी. सी. गुरुबक्षाणी यांनी सहमती दिलेली आहे.करीता या कामाचे निविदा राशी रु. ३६,९८,८००/— चे १९.४५ टक्के कमी दराने रु. २९,७९,३८३/— अधिक १८% जि.एस.टी. रु. ५३६२८९/— अधिक इंशूरन्स व चााचनी शुल्क रु. ३८०४८/— असे एकूण

रु. ३५,५३,७२०/— राशीचा अतिरीक्त कार्यादेश मे. डी. सी. गुरुबक्षाणी यांना देण्याचे प्रश्न विचारात घेणे.

टिप :

१. प्रस्तुत कामास मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.२९/०१/२०२४ ला मान्यता प्रदान केलेली आहे.
२. या कामाचा अतिरीक्त कार्यादेश राशीचा खर्च पद क्र. A४२००१३७०४०६ या पदाअंतर्गत करण्यात येणार आहे.
३. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 801/स्थायी समिति/प्रशासक** **दिनांक :- 05/03/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धरमपेठ झोन क्र. ०२ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र. २ अंतर्गत मौजा तेलंगखेडी येथे व्हेटरनरी कॉलेज ते मोठा हनुमानमंदीर पर्यंत २४.० मी. रुंद डी.पी. रस्त्याचे बांधकाम करणे या कामाची प्राकलनीय राशी रु. १९,०२,६३,५२४/— असून कामाची एकून प्रशासकीय मान्यता राशी रु. २४,५३,१६,९२०/— आहे. सदहू कामात रस्त्याचे बांधकामासह, उच्च दाब विद्यूत लाईन शिफ्ट करणे व रस्त्याचे विद्यूतीकरणाचे खर्चाचा समावेश आहे. सबंधीत रस्त्याचे स्थापत्य कामाचे कार्यादेश निर्गमीत करण्यात आले असून या कामाकरीता मे. डी.सी. गुरुबक्षाणी या कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली आहे. हा रस्ता महाराष्ट्र पशु व मत्स्यविद्यान विद्यापीठ यांचे जागेमधून जात असून रस्त्याचे कामामूळे येथील जागेचे दोन भागात विभाजन होते असल्याने संबधीत विद्यापीठामार्फत रस्त्यामूळे बाधीत जागेचे क्षेत्रफळाइतके चटईक्षेत्र देण्याची व रस्त्याचे दोन्ही बाजूस पक्की सुरक्षा भिंत बांधून देण्याबाबत विभागास पत्र दिलेले होते. त्यानुसार विभागामार्फत नगर रचना विभागाचे सल्ल्यानुसार मा. आयुक्त यांचे मान्यतेने बाधीत जागेच्या क्षेत्रफळाइतके चटईक्षेत्र देण्यास मान्यता प्रदान केली होती परंतू सुरक्षाभिंत बांधण्यास मान्यता प्रदान केलेली न्हती. या कारणास्तव महाराष्ट्र पशु व मत्स्यविद्यान विद्यापीठ यांचे मार्फत रस्ता बांधकामामूळे रस्त्याचे दोन्ही बाजूस अतिक्रमण होण्याची शक्यता असल्याने सुरक्षाभिंत बांधून देण्याचे हमी दिल्यानंतरच जागा हस्तांतरण करण्याबाबत नाहरकत देण्यात येईल असे कळविले होते. करीता पुन्हा याबाबत

मा. मुख्य अभिंयता यांनी विद्यापीठाचे कार्यकारी अभिंयता व रजिस्ट्रार यांचेशी चर्चा करुन मा. आयुक्त तथा प्रशासक यांना या बाबत अवगत केले होते. त्यानसार सुरक्षाभिंत बांधकामाकरीता लागणा—या खर्चाचे प्राकलन तयार करण्यास्तव कळविले होते. विभागामार्फत देण्यात आलेल्या प्रस्तावानुसार रस्त्याचे दोन्ही बाजूस २.६० मी. उंच सुरक्षा भिंत बांधकामाकरीता एकूण ४४,०२,६३२/— रु. खर्च अपेक्षीत असून हा खर्च कमी दराने प्राप्त निविदे मूळे आलेल्या बचतीच्या राशीतून प्रस्तावीत आहे. तसेच सदर्हू काम यापूर्वीचे मंजूर दरावर करण्यास या कामाचे कंत्राटदार मे. डी. सी. गुरुबक्षाणी यांनी सहमती दिलेली आहे. करीता या कामाचे निविदा राशी रु. ३६,९८,८००/— चे १९.४५ टक्के कमी दराने रु. २९,७९,३८३/— अधिक १८% जि.एस.टी. रु. ५३६२८९/— अधिक इंशूरन्स व चााचनी शुल्क रु. ३८०४८/— असे एकूण रु. ३५,५३,७२०/— राशीचा अतिरीक्त कार्यादेश मे. डी. सी. गुरुबक्षाणी यांना देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.